पुढारी
शनिवार, ८ जून २०२४

# डॉ. बापूजी साळुंखे जयंतीनिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची रविवार, दि. ९ जून रोजी १०६ वी जयंती आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे रविवारी सकाळी १०.३० वाजता 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जालिंदरनगरचे (ता. खेड, जि. पुणे) मुख्याध्यापक दत्तात्रय वारे यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांमधील शिक्षक, विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ८ जून २०२४

# प्रा. सलमा नदाफ-मुल्ला यांना पीएच.डी.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील प्रा. सलमा नदाफ-मुल्ला यांना शिवाजी विद्यापीठाने नुकतीच जीवरसायनशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांनी 'एकसप्लोरिंग फार्माकोलॉजीकल प्रॉपर्टीज ऑफ ग्लुटामीनेज फ्रॉम हॅलॉफिलिक बॅक्टोरिया' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. शिवाजी विद्यापीठातील डॉ. पी. बी. दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले.